फिर्यादी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धाराशिव **P.S.(ठाणे):** येरमाळा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0267 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**08/07/2026 17:36

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(अ) |

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे येरमाळा

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिंनाक पासून):** 01/07/2026

**Date To ( दिंनाक पर्यंत):** 01/07/2026

**Time From (वेळेपासून):** 15:32 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:59 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 08/07/2026 **Time (वेळ):** 17:26 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 022

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 08/07/2026 17:26 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 9 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शेत गट नं73 मध्ये , चोराखळी शिवारात,कळंब

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** योगेश भालचंद्र वेळापुरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, ,धाराशिव,येरमाळा ,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, ,धाराशिव,येरमाळा ,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9049519833

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सौरभ बाबासाहेब कांदे | | | 1. रामवस्ती,सापनाई,कळंब, येरमाळा ,धाराशिव,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1500 | 1,500.00 |



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

1,500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिंनाक

फिंयाद

08.07.2026

मी योगेश भालचंद्र वेळापुरे, वय 42 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद - पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, धाराशिव मो.क्र. 9049519833.
समक्ष पोलीस ठाणे, येरमाळा येथे हजर राहुन सरकारतर्फे फिंयाद देतो की, मी दिंनाक 30.06.2026 रोजी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, धाराशिव येथे कर्तव्यावर कार्यालयात हजर असताना तक्रारदार अभिषेक मारुती पाचभाई वय 23 वर्षे, व्यवसाय शेती रा.वाणेवाडी ता.कळंब जि.धाराशिव मो.नं. 9834556173 यांनी आम्हाला फोन वरुन संपर्क करुन एका लोकसेवका विरुध्द लाच मागणी बाबत तक्रार देणे असल्याचे सांगुन तक्रारदार हे धाराशिव साखर कारखाना, चोराखळी येथे येऊन तक्रार देणार असून, सदर तक्रार नोंदवून घेणे बाबत विंनती केली असता, आम्ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धाराशिव यांचेकडुन दोन पंच यांची मागणी केली असता, त्यांनी दोन पंच उपलब्ध केल्याने सदर दोन पंच आमचे कार्यालयात हजर झाले.

त्यावेळी मी योगेश भालचंद्र वेळापुरे, पद- पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. धाराशिव अशी पंचांना ओळख करुन दिली. त्यावेळी कक्षात पोहेकॉ/अनपट, पोना/शेवाळे, पोकॉ/ शेरकर हजर होते. त्यानंतर पंचांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव 1) ओंकार शिवाजी राजगुरु, वय 24 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- कनिष्ठ सहाय्यक लेखा, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव. रा. पोस्ट ऑफीस समोर, लोहारा ता.लोहारा जि. धाराशिव 2) शैलेश लक्ष्मण सोमनवाड, वय 26 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- कनिष्ठ सहाय्यक लेखा, कृषी विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव. रा. बार्शी नाका, धाराशिव जि.धाराशिव असे सांगितले. त्यावेळी मी दोन्ही पंच व पोलीस अंमलदार यांना आज दि 30.06.2026 रोजी एका तक्रारदाराने आम्हाला फोन वरुन संपर्क करुन एका लोकसेवका विरुध्द लाच मागणी बाबत तक्रार देणे असल्याचे सांगुन धाराशिव साखर कारखाना, चोराखळी जवळ येऊन तक्रार नोंदवून घेणे बाबत विंनती केली आहे. त्यावरुन आपण आज रोजी धाराशिव साखर कारखाना, चोराखळी येथे जाऊन सदर तक्रारदार यांची तक्रार घेणार असल्याचे सांगितले.
त्यानंतर आम्ही व सोबत पोहेकॉ/अनपट, पोना/शेवाळे, पोकॉ/ शेरकर व दोन पंच सापळा कारवाईसाठी लागणारे आवश्यक ते साहित्य घेऊन शासकीय वाहन क्र. एम.एच. 25 ए.डब्ल्यू. 7842 ने लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, धाराशिव येथुन धाराशिव साखर कारखाना, चोराखळीकडे 15.40 वाजता रवाना होवुन 16.35 वा. धाराशिव साखर कारखाना, चोराखळी येथे पोहचलो. त्यानंतर तेथे एक इसम आमचे शासकीय वाहनाजवळ आला. त्यावेळी आम्ही सदर इसमास त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अभिषेक मारुती पाचभाई वय 23 वर्षे, व्यवसाय शेती रा.वाणेवाडी ता.कळंब जि.धाराशिव असे सांगितले. त्यावेळी आम्ही तक्रारदार, पंच व स्टाफ यांचा आपसी परिचय करुन दिला. त्यानंतर तक्रारदार पाचभाई यांना त्यांची तक्रार विचारली असता, त्यांनी त्यांची तक्रार सांगितली. त्यातील थोडक्यात मजकुर असा की, माझी आई शोभा मारुती पाचभाई याची नावाने चोराखळी शिवारातील शेत गट नंबर 73 मध्ये मागेल त्याला सौर कृषी पंप योजना या योजने अंतर्गत सौर कृषी पंप घेण्यासाठी मोबाईलवरुन ऑनलाईन पध्दतीने आईच्या नावाने अर्ज भरला होता.

त्यावरुन माझी आईच्या नावाने सौर कृषी पंप मंजुर झालाने मी सदर वेबसाईटवर ऑनलाईन 30697/-रुपये भरले आहेत. त्यानंतर मी वेबसाईटवर सौर कृषी पंपची निवड केली आहे. त्यानंतर आज दिंनाक 30.06.2026 रोजी मला मोबाईल क्रमांक 7020544894 यावरुन माझा मोबाईल क्रमांक 9834556173 यावर फोन आला होता. त्यावेळी फोनवरुन मी सौरभ बोलतोय, मी तुमच्याकडे मागेल त्याला सौर कृषी पंप योजना अंतर्गत मंजुर झालेले सौर कृषी पंप संदर्भात उदया तुमच्याकडे येऊन सर्व्हे करणार आहे. त्या सर्व्हेसाठी मला व अधिकारेला



Scanned with OKEN Scanner

देण्यासाठी असे मिळुन 1500/-रुपये दयावे असे म्हणाले आहेत.
तरी सौरभ यांनी सर्व्हेसाठी माझेकडे मागीतलेले 1500/-रुपये ही कोणतीही शासकिय फी नसुन, ती लाचच असल्याची मला खात्री झाली आहे. मला सौरभ यांना लाच देण्याची ईच्छा नाही. माझी व सौरभ यांचेत यापुर्वी कोणत्याही प्रकारचे व्यवहार नाहीत. अथवा त्याची माझी आपसू दुश्मनी नाही. उदया सौरभ माझे आईच्या नावे असलेल्या शेत गट नंबर 73 मध्ये सौर कृषी पंपच्या सर्व्हेसाठी येणार असून, त्यानी सदर सर्व्हे वेळी माझेकडे पैसे मागीतले तर त्यावर कायदेशीर कारवाई करावी विंनती. वगैरे मजकुरचा हस्तलिखित तक्रारी अर्ज दिला. त्यानंतर आमचे सुचनेवरुन तक्रारदार अभिषेक पाचभाई यांनी त्यांची तक्रार दोन्ही पंचासमक्ष पुन्हा सांगितली. त्यानंतर तक्रारदार यांनी दिलेली लेखी तक्रार व तोंडी तक्रार एकच असल्याची पंचाची खात्री झाल्यानंतर पंच क्रमांक 1 म्हणुन राजगुरु व पंच क्रमांक 2 म्हणुन सोमनवाड यांनी तक्रारी अर्जावर सहया केल्या.
त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना सौरभ हे केंव्हा शेतात सर्व्हेसाठी येणार आहेत असे विचारले असता तक्रारदार पाचभाई यांनी सौरभ हे सर्व्हेसाठी उदया येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी वेळापूरे साहेब यांना कळविले की, मला सौरभ यांचा फोन आल्यानंतर मी आपणास संपर्क करुन कळवितो त्यावेळी आपण चोराखळी शिवारात माझे आईचे नावे असलेल्या शेत गट नंबर 73 मध्ये येऊन पुढील कारवाई करावी अशी विंनती केली. दिंनाक 30.06.2026 रोजी सौरभ यांची भेट झाली नाही. सदर कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
त्यानंतर दिंनाक 01.07.2026 रोजी तक्रारदार पाचभाई यांचे शेतात सौरभ हे सर्व्हे करण्यासाठी येणार असल्याने त्यांचे वाणेवाडी शेतातील शेत गट नंबर 73 मध्ये लाचमागणी पडताळणी करण्याचा र्निणय घेतला. त्यानंतर तक्रारदार यांचेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन दिल्यानतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरुन सौरभ यांना फोन केला असता, सौरभ यांनी ते त्यांचेकडे काही वेळात येणार असल्याचे सांगितले. त्यामुळे तक्रादार अभिषेक पाचभाई व पंच क्र. 1 राजगुरु यांना शेत गट नंबर 73 मध्ये पाठविले. त्यानंतर काही वेळातच सौरभ यांनी तक्रारदार यांचे शेत गट नंबर 73 मध्ये येऊन तक्रारदार यांची भेट घेऊन सर्व्हे केला. सदर वेळी तक्रारदार यांचेकडे सर्व्हेसाठी सौरभ यांनी स्वत:साठी व आय.डी. असलेले अधिकारी लाईनमन यांना देण्यासाठी 1500/-रुपये लाचेची मागणी केली. एकंदरित लाचमागणी पडताळणी दरम्यान तक्रारदार यांना त्यांचे आईचे नावे असलेल्या शेत गट नंबर 73 मधील मंजुर सौर कृषी पंपाचे सर्व्हेकरीता सौरभ यांनी तक्रारदार यांचेकडे 1500/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम लागलीच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.
त्यानंतर आम्ही सविस्तर सापळापुर्व कारवाई करुन सौरभ बाबासाहेब कांदे यांनी तक्रारदार अभिषेक पाचभाई यांना धाराशिव साखर कारखाना, चोराखळीजवळ लाचेची रक्कम घेऊन बोलावल्याने त्यांचे विरुध्द धाराशिव साखर कारखाना, चोराखळी येथे सापळा कारवाईचे आयोजन केले असता, तेथे सौरभ हे हजर नसल्याने तक्रारदार यांनी पंच क्र. 1 राजगुरु यांचे समक्ष सौरभ यांना फोन केला असता, सौरभ यांनी, ते परतापुर येथे चालले असल्याचे सांगीतले. त्यानंतर बराच वेळ झाल्याने तक्रारदार यांनी सौरभ यांना फोन केला केला. सदर फोनवर सौरभ यांनी ते परतापुर येथे असल्याने उदईक रोजी भेटुन पैसे देण्याचे सांगीतले. त्यावरुन दिंनाक 01.07.2026 रोजीची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली होती.
त्यानंतर दिंनाक 02.07.2026 रोजी पुन्हा सौरभ बाबासाहेब कांदे यांचे विरुध्द सापळा कारवाईचे आयोजन केले. दरम्यान तक्रारदार पाचभाई यांनी पंच क्रमांक 1 राजगुरु यांचे समक्ष सौरभ बाबासाहेब कांदे यांना फोन केला असता, सौरभ बाबासाहेब कांदे यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर काही वेळाने आणखीन एकदा तक्रारदार पाचभाई यांनी पंच क्रमांक 1 राजगुरु यांचे समक्ष सौरभ बाबासाहेब कांदे यांना फोन केला असता, सौरभ बाबासाहेब कांदे यांनी फोन कट केला. त्यानंतर तक्रादार यांनी आम्हाला कळविले की, सौरभ बाबासाहेब कांदे हे त्यांचा फोन उचलत नसल्याने सौरभ कांदे यांनी नंतर तक्रारदार यांना फोन केला तर ते आम्हाला कळवुन सौरभ कांदे यांचेविरुध्द सापळा करवाई करावी अशी विंनती केल्याने दिंनाक 02.07.2026 रोजीची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली होती.
त्यानंतर तक्रादार अभिषेक पाचभाई यांनी आम्हाला दिंनाक 08.07.2026 रोजी सांगितले की, सौरभ यांना तक्रारदार यांचा कसलातरी संशय आल्याने ते तक्रारदार यांचेकडुन पैसे स्विकारणार नसल्याची त्यांची खात्री झाली आहे. तसेच सौरभ हे यापुढे त्यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारणार नसल्याची त्यांची खात्री झाल्याने सौरभ बाबासाहेब कांदे यांचेविरुध्द पुढील कायदेशीर कारवाई करणे बाबत विंनती केली होती.
तरी आज दिंनाक 08.07.2026 रोजी सौरभ बाबासाहेब कांदे हे मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेतले. तेंव्हा त्यांचेकडे त्यांचे नाव पद बाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नाव सौरभ बाबासाहेब कांदे, वय 25 वर्ष, पद- खाजगी ईसम, रा. रामवस्ती, सापनाई ता.कळंब जि.धाराशिव असे सांगितले.



Scanned with OKEN Scanner

तरी सौरभ बाबासाहेब कांदे, वय 25 वर्ष, पद- खाजगी ईसम, रा. रामवस्ती, सापनाई ता.कळंब जि.धाराशिव यांनी तक्रारदार अभिषेक मारुती पाचभाई यांचे आईचे नावे मागेल त्याला सौर कृषी पंप यांजनेअंतर्गत मंजुर झालेल्या सौर पंपाचे सर्व्हे करणे करीता सौरभ बाबासाहेब कांदे यांनी स्वत:साठी व आय.डी.असलेले अधिकारी लाईनमन यांना देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे केलेल्या सर्व्हेच्या कामाचे बक्षीस म्हणुन पंचासमक्ष दिनाक 01.07.2026 रोजी 1500/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले आहे. म्हणुन माझी सरकारतर्फे खाजगी ईसम सौरभ बाबासाहेब कांदे, वय 25 वर्ष, पद- खाजगी ईसम, रा. रामवस्ती, सापनाई ता. कळंब जि.धाराशिव यांचेविरुध्द भ्रष्टचार प्रतिंबध अधिनियम,1988 चे कलम 7 अ प्रमाणे कायदेशीर फिंयाद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

yeshwant vishnupant ghodke(SI (Sub-Inspector)) / API **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

Scanned with OKEN Scanner

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): yeshwant vishnupar
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): API

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे येरमाळा

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with OKEN Scanner